05 JUN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातून पाच वर्षांत तेराशे पीएच.डी. धारक

## संशोधनाचा वाढला टक्का, प्रशासनाच्या प्रयत्नांना यश

**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

**शिवाजी विद्यापीठाची विविध पातळ्यांवर सध्या घोडदौड सुरू आहे. संशोधानामध्येही विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. गेल्या पाच वर्षांत तब्बल १,३०८ जणांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनपूरक धोरणांचा हा परिपाक आहे.**

शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेवर जागतिक पातळीवरील विविध संस्थांनी मोहोर उमटवली आहे. देशभरात गेल्या ५ वर्षांत पीएच.डी. करणाऱ्यांची संख्या १०९ टक्क्यांनी वाढली आहे, तसेच शिवाजी विद्यापीठामध्ये संशोधन करणाऱ्यांच्या संख्येमध्ये सातत्याने वाढ होत आहे. शैक्षणिक वर्षात सरासरी २५० विद्यार्थी पीएच.डी. पदवी पूर्ण करतात. कोरोना

**भाग - १**

काळात पीएच.डी. करणाऱ्यांची संख्या काहीशी कमी झाली; मात्र इतर शैक्षणिक वर्षांमध्ये संशोधक विद्यार्थ्यांचे प्रमाण अतिशय चांगले आहे.



### पाच वर्षांतील पीएच.डी.धारक

| | |
|---|---|
| २०१८-१९ | ३०० |
| २०१९-२० | २२४ |
| २०२०-२१ | १७१ |
| २०२१-२२ | ३५२ |
| २०२२-२३ | २६१ |



### आलेख चढताच राहील

विद्यापीठातील विद्यार्थी, तसेच शिक्षकांनी संशोधनामध्येही पुढे यावे, यासाठी विद्यापीठातर्फे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन ते डिक्लरेशन ही संपूर्ण प्रक्रिया सुलभपणे पार पाडण्याकडे विद्यापीठाचे लक्ष असते. संशोधनाचा हा आलेख असाच चढता राहील, असा विश्वास आहे.

– डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

शिक्षण क्षेत्रामध्ये पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी समजली जाते. विद्यापीठाकडून संशोधनासाठी मिळणारे प्रोत्साहन, संशोधन पूर्ण झाल्यानंतर प्राध्यापकांना मिळणारी पगारवाढ, यामुळे प्राध्यापकांमध्ये पीएच.डी. पदवी पूर्ण करण्याकडे कल वाढत आहे. अनेक खासगी आस्थापनांमध्येही पीएच.डी.धारकांना प्राधान्य मिळत असल्याने अनेक विद्यार्थ्यांचा ओढा पीएच.डी. पूर्ण करण्याकडे आहे.

पुढारी

# लोककल्याण हेच शिवाजी महाराजांचे अंतिम ध्येय होते

## डॉ. केदार फाळके : शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे व्याख्यान

**कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा**

लोककल्याणासाठी हिंदवी स्वराज्य हे शिवाजी महाराजांचे अंतिम ध्येय होते, असे प्रतिपादन शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदार फाळके (पुणे) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३५० व्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरातील व्याख्यानात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे अध्यक्षस्थानी होते. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मशिवचरित्र :सरंजामशाहीतून स्वातंत्र्याकडे विस्तारित जाणारी क्षितीजेफ या विषयाच्या अंनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविधंगी कार्याची आणि त्यांच्या द्रष्टेपणाची विविध उदाहरणे देत डॉ.फाळके यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक लढाईया केल्या. त्याहीपेक्षा दुप्पट वेळ त्यांनी लोक कल्याणासाठी घालवला. लोक कल्याणासाठीच त्यांनी सार्वभौमत्व सत्तेसाठी राज्याभिषेक करून घेतला. शिवचरित्रातून चारित्र्यवान, धैर्यवान बना असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

प्रास्ताविक एन. एस. एस. विभागाचे . संचालक डॉ. टी.एम.चौगुले यांनी केले. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. एम. देसाई यांनी आभार मानले.